मास्टर भगवान यांचे निधन



मुंबई, ४ फेब्रुवारी (लो.प्र.)

'भोली सूरत दिल के खोटे' या गीताच्या पंक्ती ऐकताच गेल्या जवळपास ५० वर्षांपासून आबालवृद्धांना त्याच्या ठेक्यावर ताल धरावयास लावणारे आणि ते गाणे आपल्या नृत्याविष्काराने अजरामर करणारे विख्यात चरित्र आणि विनोदी अभिनेते मास्टर भगवान तथा भगवान पालव यांचे आज दादर येथील त्यांच्या राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते.

भगवानदादा यांच्या निधनाने हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली असून चित्रपट तसेच राजकीय नेते आणि अन्य विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. भगवानदादा यांच्या पश्चात चार पुत्र, तीन कन्या, नातवंडे असा परिवार आहे. आपल्या घरात झालेल्या किरकोळ अपघातानंतर गेल्या काही दिवसांपासून ते चाकांच्या खुर्चीवरूनच फिरत होते. आज सकाळी त्यांना अधिकच अस्वस्थ वाटू लागल्याने डॉक्टरांना पाचारण करण्यात आले. परंतु हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यांची प्राणज्योत मालवली.

भगवानदादा यांचा जन्म १ ऑगस्ट १९१३ रोजी झाला. त्यांना कुस्तीची आवड होती. मूकपटांच्या जमान्यात 'क्रिमिनल' हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यानंतर मात्र भगवानदादा हे चांगलेच गाजले ते त्यांच्या नृत्याविष्काराने. जवळपास १०० चित्रपटातून त्यांनी भूमिका केल्या त्यापैकी ३० चित्रपट भगवान प्रॉडक्शनचे होते. १९५० ते १९६० च्या दशकात हिंदी चित्रपटसृष्टीवर त्यांची छाप होती. रांबा, सांबा, डिस्को आणि रॉक-एन-रोल हे नृत्यप्रकार त्यांनीच हिंदी चित्रपटात आणले. त्यानंतर दादांनी मुंबईत जागृती स्टुडिओ काढला पण कालांतराने तो बंद करावा लागला.

भगवान प्रॉडक्शन निर्मित 'अलबेला' या चित्रपटातील उडत्या ठेक्याची गाणी आणि भगवानदादा-गीताबाली या जोडीचा सहजसुंदर अभिनय याला रसिक प्रेक्षकांची भरभरून दाद मिळाली. दादांनी 'भागम भाग', 'चोरीचोरी', 'झनक झनक पायल बाजे' यासारख्या ४०० चित्रपटांतून भूमिका केल्या. संवाद फेकीतील विशिष्ट लकब आणि हळुहळू बोलत जाण्याची शैली यामुळे ते विनोदी अभिनेते म्हणून चांगलेच गाजले. राज खोसला दिग्दर्शित सर्वच चित्रपटातून भगवानदादा यांनी भूमिका केल्या. 'मेरा गाव मेरा देश' आणि अगदी अलीकडचा 'मैने प्यार किया' या चित्रपटात भूमिका केल्या. त्यांनी ४८ चित्रपटांची निर्मिती आणि दिग्दर्शनही केले. 'अलबेला' आणि 'भागम भाग' या चित्रपटाची रिळे वगळता त्यांच्या अन्य चित्रपटांची रिळे बॉम्बे लॅबोरेटरीला लागलेल्या आगीत जळून खाक झाली. 'जागृती पिक्चर्स'ची स्थापना करून त्यांनी 'बदला' हा चित्रपट काढला. या चित्रपटामुळे स्टंटपटाचे युग आले आणि भगवान, बाबुराव पैलवान, वसंतराव पैलवान अशी जोडी जमली. त्यानंतर

पान ७ पाहा ➤

मास्टर भगवान यांचे निधन

पान १ वरून ➤ बहादूर, जलन, मददगार, दोस्ती, शेकहॅन्ड, बचके रहना, भोलेभाले, मतलबी अशी स्टंटपटांची रांग लागली. 'भेदी बंगला' हा भारतातील पहिला हॉरर चित्रपट म्हणता येईल. त्यांच्या चित्रपटांना सी. रामचंद्र यांनी अण्णा या नावाने संगीत दिले. त्यानंतर त्यांनी आपला मोर्चा सामाजिक आशय असलेल्या चित्रपटांकडे वळविला.

सामाजिक चित्रपटांच्या आशयातील 'अलबेला' हा चित्रपट आणि त्यामधील बलमा बडा नादान, शोला जो भडके, भोली सुरत दिलके खोटे, धिरे से आजा रे ही गाणी अजरामर झाली. या चित्रपटाची आणि त्यामधील गाण्यांची लोकप्रियता इतकी होती की १९७५ मध्ये पुन्हा प्रदर्शित होऊन पुन्हा तुफान चालला. त्यानंतर आलेला 'झमेला' हा चित्रपट साफ आपटला आणि दादांचा पडता काळ सुरू झाला. रंगीला, शोला जे भडके, सच्चेका बोलबाला, हम दिवाने, लाबेला हे चित्रपटही साफ कोसळले. झमेला नंतर सी. रामचंद्र आणि दादा यांच्यातील संबंध बिघडले ते पुन्हा दहा वर्षांनी जुळले. १९६८ नंतर त्यांनी चित्रपट निर्मिती बंद केली.

दादांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी दु:ख व्यक्त केले आहे. वैशिष्ट्यपूर्ण पदलालित्य आणि खट्याळ स्वभाव यामुळे ते चित्रपटसृष्टीचे खरेखुरे 'दादा' बनले. त्यांची स्वत:ची वेगळी नृत्यशैली होती व त्या काळात त्या शैलीने अनेकांना वेड लावले होते. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत हसतमुख राहणाऱ्या आणि सर्वांना हसवत ठेवणाऱ्या या कलाकाराच्या निधनाने साऱ्या महाराष्ट्रातील रसिक शोकाकूल होणे स्वाभाविक आहे, असे मुख्यमंत्र्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी दादांच्या निधनाने चित्रपटातील 'भगवान' हरपला अशा शब्दात शोक व्यक्त केला आहे. दादांच्या भूमिका चित्रपटात विशिष्ट आठवण करून देणाऱ्या होत्या. त्यांच्या संवादफेकीच्या लकबीवर रसिक प्रेक्षक बेहद खूश होते. आपल्या खास शैलीतील अभिनय आणि नृत्याने आबालवृद्धांना वेड लावणारे दादा काळाच्या पडद्याआड गेले आहेत, असे सांस्कृतिक कार्यमंत्री रामकृष्ण मोरे यांनी म्हटले आहे. त्यांची कारकीर्द ही चित्रपटसृष्टीचा एक कालखंडच होता, असेही मोरे यांनी म्हटले आहे. रिपब्लिकन पक्षाचे नेते खासदार रामदास आठवले, मुंबई भाजपाचे अध्यक्ष विनोद तावडे यांनीही दादांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले आहे.

भगवानदादा यांच्या आयुष्यातील अखेरचे दिवस फार हलाखीचे होते. दादरमधील चाळीत केवळ एका छोट्याशा खोलीत त्यांचे वास्तव्य होते. विनोदी अभिनेते म्हणून एक काळ गाजविणारे दादा त्यानंतर चरित्र अभिनेत्याच्या भूमिका करू लागले त्यांना तर 'एक्स्ट्रा' [illegible] वेळ

त्यांच्यावर आली